# Quality Objective :

**मौजे देवळाली ता. करमाळा**

----------------------------------------------------------------------------------------------------




करमाळा तालुक्यातील मौजे देवळाली ३१३९ लोकसंख्या असलेले गाव ४४९ कुंटूंब संख्या असलेल्या या गावात पाण्याचा प्रश्न उन्हाळा आल की भयंकर रुप धारण करत असे. दरवर्षीच्या उन्हाळयात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याशिवाय अन्य कोणताही पर्याय उपलब्ध नव्हता. टँकरद्वारे पाणी भरण्यासाठी होणारी धावपळ, भांडण,मारामारी हे सर्व अनुभव उन्हाळयाच्या काळात ग्रामस्थांना घ्यावे लागत असे.

जलस्वराज्य प्रकल्पाची अमंलबजावणी सुरु झाल्या नंतर गावानी या योजनेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. जलस्वराज्य प्रकल्पातील पहिल्या टप्प्यात निवड झालेले हे गाव. गावाला काय स्वरुपी पाणी पुरवठा करण्यासाठी काय काय उपाय करायचे याचा अभ्यास करण्यांत आला. गावाला सुरु असलेल्या पाणी पुरवठा हा गावाजवळ असलेल्या पाझर तलावातील खालील बाजुच्या विहीरीतून सुरु होता. पण उन्हाळयात मात्र विहीर पुर्णतः कोरडी पडलेली असायची. गावाच्या जवळपास अन्य कोणत्याही माध्यमातून कायमस्वरुपी पाणी पुरवठा करण्यासाठीचा सोर्स उपलब्ध नाही. यासाठी एकमेव पर्याय सर्वांच्या लक्षात आला. तो लांब आहे. पण कायमस्वरुपी आहे. गावापासून १८ कि.मी. अंतरावर असलेल्या उजनी धरणातून Back water पासून गावासाठी कायमस्वरुपी पाणी पुरेल अशी पाणी पुरवठा योजना करण्याचा निर्णय झाला व त्याप्रमाणे कामाला सुरुवात झाली.

१ कोटी १२ लाख रुपयाचा गावकृती आराखडा तयार करण्यांत आला व त्यानुसार योजना पूर्ण करण्यास सुरुवात झाली. लोकवर्गणी जमा करण्यामध्ये गावाने खुप चांगला प्रतिसाद दिला. इतकी मोठी योजना गावासाठी होत असल्यामुळे या योजनेबददल लोकांमध्ये उत्सुकता होती. तर कायमस्वरुपी पाण्याचा प्रश्न मिटणार याचा आनंद होता.

१८ कि.मी.अंतरावरुन धरणातील पाणी आणण्यासाठी आपल्या तांत्रिक बाबी पुर्ण करुन जलशुध्दीकरण केंद्र,साठवण टाकी, शुध्द जलपंपगृहाची उभारणी उर्ध्वनलिका,वितरण व्यवस्था पुर्ण करण्यांत आल्या.

**जलशुध्दीकरण केद :**

उजनी धरणातील Back Water मधून हि योजना असल्यामुळे उपलब्ध असलेले पाणी शुध्द करणे आवश्यक होते.




त्यासाठी आवश्यक अशा जलशुध्दीकरण केंद्राची उभारणी करण्यांत आली.

या जलशुध्दीकरण केंद्रात दररोज ०.५ दशलक्ष लीटर प्रतिदिन पाणी शुध्द करण्याची क्षमता आहे. गावासाठी यातून आवश्यक पाणी २.५ लाख लीटर हवे असते. पी फॅब्रीकेटर जलशुध्दीकरण केंद्र या जलशुध्दीकरण केंद्रात पाणी शुध्द करण्याची प्रकिया धरणातून पाणी पुरवठा -- मिक्सींग चॅनल -- फ्लोपूलीटर -- टयुबसेटलर -- फिल्टर -- निर्जंतूकीकरण -- साठवण टाकी -- पंपीग -- उंच टाकी -- वितरण व्यवस्था -- नळ कनेक्शन -- घराघरात पाणी पुरवठा या प्रकियेतून धरणातील पाणी शुध्द करुन घराघरात पोहचवण्याची प्रकिया पूर्ण झाली आहे.

विद्युत व्यवस्था :

अनेकदा पाण्याची उपलब्धता असली तरी विद्युत पुरवठा नसल्यामुळे पाणी वापरता येत नाही. देवळालीच्या या योजनेतील असेच होऊ नये यासाठी जास्तीचे १ लाख रु. खर्च करुन आवश्यक असणारे विद्युत कनेक्शन घेण्यात आले. धरणाच्या जवळ एक्सप्रेस फिडर चे कनेक्शन घेतल्यामुळे या ठिकाणी २४ तास विद्युत पुरवठा असतो तर दुस-या पंपीगसाठी भगीरत मधून कनेक्शन घेतल्यामुळे त्या ठिकाणी १६ तास विद्युत पुरवठा सुरु असतो.

पाण्याच्या उपलब्धते बरोबरच विद्युत व्यवस्थेचा कायम स्वरुपी विचार करुन योजना पूर्ण करण्यांत आली आहे.




पुरेसे भरपूर पाणी, सतत सुरु असलेला वीजपुरवठा व अतिशय कडक उन्हाळयातही दोन वेळस आवश्यक तेवढे नियमीत पाणी घराघरात मिळत आहे. या अगोदरच्या प्रत्येक उन्हाळयात पाण्यासाठी होणारा त्रास आज कुणालाही जाणवत नाही. त्याचाच परिणाम म्हणून नळ कनेक्शन व देखभाल दुरुस्ती रक्कम भरण्यातही ग्रामस्थानी उत्साह दाखवला आहे.

जलस्वराज्य प्रकल्पाच्या महत्वकांक्षी योजनेमुळे देवळाली गावाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आजतरी कायमस्वरुपी मिटला आहे. याचा आनंद दररोज पाणी भरताना सर्व ग्रामस्थ अनुभवत आहेत. मनातून जलस्वराज्यला धन्यवाद देत आहेत.